# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


म्हाडा MHADA

जावक क्रमांक – ७६६/६१ दिनांक :- ०२ मे, २०२५

प्रसिद्धिपत्रक

म्हाडा पुणे मंडळ प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर सदनिका वितरण

**ऑनलाईन देकार पत्रावर उपमुख्य अधिकारी यांची डिजीटल स्वाक्षरी असल्याची खात्री करुनच अर्जदारांनी पुढील कार्यवाही करावी -** पुणे मंडळ मुख्य अधिकारी राहुल साकोरे

मुंबई, दि. ०२ मे, २०२५ :- पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) विक्रीअभावी शिल्लक सदनिका प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर वितरित करण्यासाठी नोंदणी व वितरण प्रक्रिया https://bookmyhome.mhada.gov.in/या संकेतस्थळावर सुरु झाली आहे. सदर प्रक्रियेद्वारे सदनिका वितरीत करण्यासाठी देण्यात येणाऱ्या ऑनलाईन देकार पत्रावर उपमुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांची डिजीटल स्वाक्षरी असल्याची खात्री करुनच पुढील कार्यवाही करण्याचे आवाहन पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. राहुल साकोरे यांनी अर्जदारांना केले आहे.

श्री. साकोरे म्हणाले की, विकासकांनाही सुचित करण्यात येते की, उपमुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांच्या डिजीटल स्वाक्षरीची शहानिशा केल्याशिवाय कोणत्याही व्यक्तिसोबत सदनिकेचा विक्री करारनामा करु नये अन्यथा विकासक तसेच संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. गरजू व पात्र लाभार्थ्यांना सदर सदनिका वितरणाची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शी असून या प्रक्रियेद्वारे वितरीत करण्यात येणारे देकार पत्र ऑनलाईन पद्धतीने लाभार्थ्यांच्या लॉग-इन आयडीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येते व त्यावर उपमुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांची डिजीटल स्वाक्षरी करण्यात येते. कोणतेही देकार पत्र मानवी हस्ताक्षर करुन तसेच रबरी शिक्क्याचा वापर करुन दिले जात नसल्याचे श्री. साकोरे यांनी सांगितले.

म्हाडा पुणे मंडळाने १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण व २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ऑक्टोबर-२०२३ पूर्वीच्या सोडतीनंतर विक्री न झालेल्या सदनिका वितरणासाठी कोणत्याही एजन्सीची नेमणूक केलेली नाही व कोणत्याही व्यक्तीस एजंट म्हणून नियुक्त केलेले नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये, असे आवाहन श्री. साकोरे यांनी केले आहे.

###

मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

========================================================

Outward No. : 766/61 Dt. May 2, 2025

Press Release

Flat distribution on First Come, First Serve basis begins at MHADA Pune Board

**Applicants are advised to proceed only after confirming the digital signature of the Deputy Chief Officer on the offer letter issued online -** Pune Board Chief Officer Mr. Rahul Sakore

Mumbai, May 2, 2025: The Pune Housing and Area Development Board (a regional unit of MHADA) has initiated the process of registration and distribution of unsold flats on a First Come, First Serve basis through the official portal https://bookmyhome.mhada.gov.in. Pune Board Chief Officer Mr. Rahul Sakore has appealed to all applicants to proceed only after confirming that the offer letter made available online bears the digital signature of the Deputy Chief Officer, Pune Board.

Mr. Sakore further stated that developers must also ensure that no sale agreement is entered into with any applicant unless the offer letter is digitally signed by the Deputy Chief Officer. Failure to verify the same may attract legal action against both the concerned developer and the applicant.

The process of allotment has been designed to be completely online and transparent. Offer letters are issued electronically through the applicant's login credentials on the official portal and are digitally signed by the Deputy Chief Officer. Mr. Sakore clarified that no offer letters are issued manually, and neither handwritten signatures nor rubber stamps are used.

Mr. Sakore informed that certain flats under the 15% Social Housing and 20% Inclusive Housing categories remained unsold after the October 2023 lotteries. For the distribution of these remaining flats, MHADA Pune Board has not appointed any agency or individual. He appealed to citizens not to respond to any unauthorised claims or misleading offers.

###

Chief Public Relations Officer / MHADA